दैनिक
सोलापूर भूषण

# प्रतिभा कॉलेज व क्विक हिल कंपनीच्या वतीने जनता विद्यालय जुनियर कॉलेज येथे सायबर गुन्ह्याविषयक मार्गदर्शन शिबिर संपन्न



सोलापूर भूषण

टेंभुर्णी (प्रतिनिधी):- प्रतिभा कॉलेज चिंचवड व क्विक हिल कंपनीच्या वतीने सायबर वॉरियरस द्वारा सायबर गुन्हे विषयक सोलापूर टेंभुर्णी येथील जनता विद्यालय व जुनिअर कॉलेज या शाळेत जनजाग्रुति मोहीम राबविण्यात आले.

सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम वर्षभर राबविला जातो. त्या अंतर्गत महाराष्ट्रा सायबर क्राईम पोलीस यांच्या सायबर सुरक्षा अभियानांतर्गत क्विक हिल कंपनीच्या सहकार्याने प्रतिभा कॉलेज चिंचवडचे विद्यार्थी सायबर वॉरियर्स म्हणून जनजागृतीचे कार्य करत आहे. याच अनुषंगाने सोलापूर टेंभुर्णी येथीलजनता विद्यालयात विद्यार्थांना सध्या वाढते, सायबर गुन्हे विषयक नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी या विषयी जनजागृती करण्यात आली. आजची तरुण पिढी मोबाईलचा जास्तीत जास्त वापर करत आहेत. इंटरनेटच्या जगात आपल्याला एका क्लिकवर सर्व माहिती मिळत असली तरी त्याच्या चुकीच्या वापराने अनेक दुष्परिणामाला सामोरे जावे लागते. मोबाईलद्वारा चुकीच्या लिंक ओपन करणे किंवा ओटीपी शेअर करणे, मुलींच्या फोटोचा गैर वापर करणे,

ऑनलाइन आर्थिक व्यवहार फसवणूक कशी होते. याबाबत कोठे तक्रार करावी अशा विविध सुरक्षेविषयी सायबर सेक्यूरिटीची जनजागृती वॉरियर्स द्वारा माहिती दिली जात आहे.

लोणावळ्यात या सायबर सुरक्षा मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळत असून या सायबर वॉरियर्सने लोणावळ्यातील सर्व शाळा तसेच संघटना मध्ये, अशा विविध ठिकाणी सविस्तर माहिती दिली जात आहे. या सायबर जनजागरुती मध्ये प्रतिभा महाविद्यालयातील लोणावळा शहरातील मानसी प्रदीप वाडेकर, श्रावणी सावंत या विद्यार्थिनी शिक्षिका हर्षिता वन्चानि व उज्वला बोरोले, सुप्रिया गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करत आहे चांगला प्रतिसाद मिळत आहे. यावेळी कार्यक्रमाची प्रस्तावना शाळेच्या यावेळी शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका सविता जगताप मॅडम यांनी केली . यावेळीशाळेचे पर्यविक्षक सादिक मोमीन सर, राजशेखर महामुनी सर, सूर्यकांत पाटील सर, ग्रंथपाल विरांग मेथा सर उपस्थित होते. तरआभार गणेश माढेकर सर यांनी मानले.